| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | १२.०६.२०२० | |
| नोंदणी तारीख | १२.०६.२०२० | |
| निकाल तारीख | ०८.०५.२०२६ | |
| कालावधी | वर्ष महिना दिवस | |
| | ०५ १० २६ | |

**मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर यांचे न्यायालयात**
(**पीठासीन अधिकारी एम. एम. गादिया**)

**नियमित फौजदारी खटला क्र.११३३/२०२०.**

**CNR No.MHKO030038532020.** **निशाणी क्र.३४/ब.**

**गुन्हा क्रमांक ४४३/२०१९.**

**महाराष्ट्र शासन तर्फे शाहूपुरी**
**पोलीस ठाणे, कोल्हापूर.** .. **अभियोग पक्ष**

*विरुध्द*

१. **सौ. जिजाबाई पंडीत बनकर,**
वय : ५० वर्षे, धंदा : घरकाम,
रा. मस्के शॉप जवळ, कनाननगर,
कोल्हापूर.

२. **धनश्री धनाजी बनकर,**
वय : २८ वर्षे, धंदा : घरकाम,
रा. सदर.

३. **धनाजी पंडीत बनकर,**
वय : ३० वर्षे, धंदा : ड्रायव्हर,
**रा.** सदर.

.. **आरोपी**

..........................................................................................................

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता | – | श्री. ए. एन. डोईफोडे. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | – | श्री.एस. व्ही. कुंभार |

..........................................................................................................

## न्यायनिर्णय

( दिनांक ०८.०५.२०२६ )

आरोपींविरुध्द महाराष्ट्र सावकारी(नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम ३९, ४५ व भारतीय दंड विधान,१८६० मधील कलम ३२३, ५०४, व ५०६ सह कलम ३४ खालील गुन्ह्यांसाठी दोषारोप ठेवण्यात आलेले आहे.

**०२.**अभियोगपक्षाची थोडक्यात हकिकत अशी की, जुलै २०१० मध्ये फिर्यादीचा पती सरफराजचा कुर्बान मकानदार आजारी होता व त्याच्या औषधोपचारासाठी तीस पैशाची अत्यंत आवश्यकता होती. म्हणून तीने सन २०१० मध्ये १० टक्के व्याजाने आरोपी क्र.१ कडून रुपये ५०,०००/– घेतलेले होते. सदर रक्कमेच्या परतफेडीपोटी ती तीस दरमहा रुपये ५०००/– व्याज देत होती. त्यानंतरही तीने पुन्हा आरोपी क्र.१ कडून वर नमूद व्याजदरानेच सन २०११ मध्ये रुपये २०,०००/–, सन २०१३ मध्ये रुपये २०,०००/– घेतलेले होते. ती सदर रक्कमेच्या परतफेडीपोटी आरोपी क्र.१ हीस दरमहा रुपये ७,०००/– व पुढे ९,०००/– देत होती. तीने आरोपी क्र.१ हीस व्याजापोटी रुपये ४,००,०००/– दिलेले आहेत. तसेच तीने दरमहा भिशीपोटी तीस रुपये २,८०,०००/– दिलेले आहेत. तरीही आरोपी हे तिच्याकडे वारंवार व्याजाची मागणी करीत असत, व गावाकडचे घर विका, किडणी विका पण सगळे पैसे व्याजासकट परत द्या अन्यथा

तुम्हास जिवे मारणार, अशी ते धमकी देत असत. म्हणून फिर्यादीने दिनांक २५.०७.२०१९ रोजी आरोपींविरुध्द शाहूपुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने वर नमूद गुन्ह्यांसाठी गुन्हा क्र. ४४३/२०१९ या क्रमांकाने गुन्ह्याची नोंद करण्यात आली व आरोपींना अटक करण्यात येवुन, तपासांती त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**०३**.माझ्या विव्दान पुर्वाधिका–यांनी दोषारोप(नि.१२) तयार केला आहे. सदर दोषारोपातील सर्व मजकूर आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचुन दाखवण्यात आला असता, त्यांनी गुन्हा नाकबुल करुन, चौकशी करण्याची विनंती केली. बचावपक्षाने अभियोगपक्षाची सर्व हकिकत नाकारली आहे, व आरोपींना वितुष्टातुन खोट्या गुन्ह्यात गोवण्यात आल्याचे नमूद केले आहे.

**०४**.वादप्रश्न व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत,

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपी हे विनापरवाना सावकारकीचा व्यवसाय करतात, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | ... **नाही.** |
| २. | आरोपींनी अधिकृत परवान्याशिवाय सावकारीने दिलेले पैसे वसूल करण्यासाठी उपद्रव निर्माण केला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | ... **नाही.** |
| ३. | आरोपींनी संगनमताने फिर्यादीस इच्छापुर्वक दुखापत केली, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | ... **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ४. | आरोपींनी संगनमताने फिर्यादीस प्रक्षोभीत करुन सार्वजनिक शांततेचा भंग होण्याच्या उद्देशाने तसेच इतर कोणताही अपराध घडावा, या उद्देशाने अपमान केला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |
| ५. | आरोपींनी संगनमताने फिर्यादीस फौजदारीपात्र धाकदपटशा दिला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |
| ६. | काय आदेश ? | **...आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले आहे.** |

## <u>कारणमीमांसा</u>

**०५.**दोन्ही बाजुंच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. आपल्या हकिकतीच्या पृष्ठर्थ, अभियोगपक्षाने केवळ फिर्यादीची साक्ष(नि.२३) घेतलेली आहे. अभियोगपक्षाने दिनांक २५.०७.२०१९ रोजीच्या फिर्यादचा (नि.२४) चा आधार घेतला आहे.

**<u>वादप्रश्न क्र.१ ते ५ करिता,</u>**

**०६.**सदर वादप्रश्न हे परस्परांशी निगडीत असल्यामुळे, सदर वादप्रश्नांचे विश्लेषण सोईसाठी एकत्रीतपणे करण्यात येत आहे. फिर्यादीने आपल्या सरतपासात(नि.२३) असे नमूद केले आहे की, सन २०१० मध्ये तीने आरोपी क्र.१ कडून रुपये २०,०००/–, रुपये १५,०००/– असे मिळून रुपये ९०,०००/– १० टक्के व्याजाने घेतलेले होते. सदर व्याजापोटी तीने आरोपीला रुपये ४,००,०००/– दिलेले होते. फिर्यादीच्या सरतपसात कथीत आरोपी क्र.१ कडून व्याजाने पैसे घेतलेची तारीख, ठिकाण, वेळ व स्थळ याबाबत काहीही तपशिल आलेला नाही व

तीने केवळ त्याबाबत सन २०१० हे वर्ष नमूद केलेले आहे. फिर्यादीने आरोपी क्र.१ हीच्याकडून रुपये ९०,०००/– व्याजाने घेतल्याबाबत तसेच व्याजापोटी तीस रुपये ४,००,०००/– दिल्याबाबत शब्दांव्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा दिलेला नाही. तीने फिर्यादीस रुपये ४,००,०००/– व्याज कोणत्या तारखेस व कसे दिले याचाही तपशील आपल्या साक्षीत दिलेला नाही. तीने आपल्या उलटतपासात असे नमूद केले आहे की, तीने आरोपीकडून रुपये १५,०००/– घेतलेले होते. तीस सदर विसंगतीबाबत कोणतेही कारण नमूद करता आलेले नाही. तीने पुढे असे मान्य केले आहे की, तीने आरोपी क्र.१ हीस १० वर्षे व्याज दिल्याबाबत पोलिसांकडे काहीही तक्रार केलेली नव्हती, तसेच तीने त्याबाबत इतरांनाही सांगीतलेले नव्हते. तीने आरोपीस सदर रक्कम दिल्याबाबत तीच्याकडे कागदोपत्री पुरावा नाही.

**०७.**आरोपी क्र.१ ही फिर्यादीस व्याजाने पैसे देत होती, तसेच त्यापोटी व्याज घेत होती, याबाबत फिर्यादीने पुर्णपणे मोघम साक्ष दिलेली आहे व त्याबाबत कोणतेही तपशिलवार कथन केलेले नाही. आरोपी क्र.१ ही विनापरवाना व्याजाने पेसे देण्याचा धंदा करते, असे फिर्यादीने आपल्या साक्षीत कोठेही नमूद केलेले नाही. फिर्यादीने आपल्या सरतपासात(नि.२३) असे नमूद केले आहे की, तीस एकदा एका महिन्यात पैसे देण्यास २–३ दिवस उशिर झाला, त्यावेळी सर्व आरोपी तीच्या घरी आले व तीस म्हणाले की, किडणी विक व व्याज भर किंवा तुमचे घर विक व आमचे पैसे द्या, तसेच त्यावेळी तीस वाईट शिवीगाळ केली. सदर घटनेबाबत फिर्यादीने वर्ष, वेळ, स्थळ काहीही तपशिलवार नमूद केलेले नाही. आरोपींनी तीस कोणती शिवीगाळ केली होती, याचाही तपशिल तीने केलेला नाही. आरोपींनी तीस तीच्यासोबत सदर रक्कमेसाठी झोंबाझोंबी केली किंवा तीच्यासोबत झोंबाझोंबी करण्यास इतरांना प्रवृत्त केले, असे काहीही फिर्यादीच्या साक्षीत आलेले नाही. प्रस्तुत फिर्याद दिनांक २५.०७.२०१९ रोजी म्हणजे ९ वर्षाच्या मोठ्या विलंबाने दाखल करण्यात आलेली आहे, व त्याबबत कोणतेही संयुक्तीक स्पष्टीकरण

न्यायालयासमोर आलेले नाही. एकंदरीतच आरोपी क्र.१ ही विनापरवाना सावकारी व्यवसाय करते, सदर सावकारी व्यवसायाच्या दरम्यान आरोपींनी फिर्यादीसोबत झोंबाझोंबी केली किंवा तीच्याशी झोंबाझोंबी करण्यास प्रवृत्त केले, तसेच तीस लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली, तीस अपशब्द वापरुन धमकी देवुन धाकधपटशा दिला, हे योग्य संशयविरहीतपणे शाबीत झालेले नाही. परिणामतः आरोपींविरुध्दचा सावकारी अधिनियमातील ३९ व ४५ तसेच भारतीय दंड संहीतेमधील कलम ३२३, ५०४, व ५०६ खालील गुन्हे योग्य संशयविरहीतपणे शाबीत झालेले नाहीत. म्हणुन वादप्रश्न क्र.१ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी असे आहेत.

**वादप्रश्न क्र.६ बाबत :-**

**०८.**मी वादप्रश्न क्र.१ ते ५ ला दिलेल्या नकारार्थी निष्कर्षांचा विचार करता, आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. परिणामतः वादप्रश्न क्र.६ च्या निष्कर्षादाखल, मी खालील आदेश पारित करित आहे,

## आदेश

१. आरोपींना महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम ३९, ४५ व भारतीय दंड विधान,१८६० मधील कलम ३२३, ५०४, व ५०६ खालील गुन्ह्यांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २४८(१) नुसार गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात आले आहे.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात आले, व त्यांना स्वातंत्र्य बहाल करण्यात आले आहे.

Digitally signed by MAHAVEER MOTICHAND GADIYA
Date: 2026.05.08 13:50:33 +0530

कोल्हापूर. **(एम. एम. गादिया)**

दिनांकः ०८.०५.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.

## **खटल्याचा सारांश**

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडलेली तारीख | जुलै २०१० ते २२.०७.२०१९ |
| २. | प्रथम खबर | २५.०७.२०१९ |
| ३. | दोषारोप पत्र दाखल तारीख | १२.०६.२०२० |
| ४. | दोषारोप तारीख | १५.०७.२०२२ |
| ५. | पुरावा सुरु झालेची तारीख | १७.०३.२०२५ |
| ६. | कोणत्या तारखेला निकालासाठी ठेवले | -- |
| ७. | निकाल तारीख | ०८.०५.२०२६ |
| ८. | शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | नाही. |

## आरोपी विषयी माहिती

| अ. क्र. | आरोपींची नावे | अटक तारीख | जामीनावर सुटलेली तारीख | केलेले गुन्हे | निर्दोष किंवा शिक्षा | दिलेली शिक्षा | फौजदारी दंड संहितेच्या कलम ४२८ साठी खटल्यादरम्यान ताब्यात घेतलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सौ. जिजाबाई पंडीत बनकर | ... | १५.०७.२०२२ | महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम ३९, ४५ व भारतीय दंड विधान,१८६० मधील कलम ३२३, ५०४, व ५०६ | निर्दोष मुक्तता | .... | .... |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | सौ. धनश्री धनाजी बनकर | ... | १५.०७.२०२२ | ....''.... | निर्दोष मुक्तता | .... | .... |
| ३. | श्री.धनाजी पंडीत बनकर | ... | १५.०७.२०२२ | ....''.... | निर्दोष मुक्तता | .... | .... |

## फिर्यादी/बचाव/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**(अ) – अभियोग पक्षातर्फे साक्षी यादी –**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | मिराबी कुर्बानअदीशहा मकानदार(अ.सा.१) | फिर्यादी(नि.२३) |

(ब) – बचाव पक्षातर्फे साक्षीदार – निरंक

(क) – न्यायालया तर्फे साक्षीदार – निरंक

## फिर्यादी/बचाव/ न्यायालयीन निशाणी क्रमांक –

(अ) – अभियोग पक्षातर्फे निशाणी –

| अ.क्र. | तपशिल | निशाणी |
|---|---|---|
| १. | फिर्याद | २४ |

(ब) – बचाव पक्षातर्फे निशाणी – निरंक

(क) – न्यायालयातर्फे निशाणी – निरंक

(ड) – भौतिक वस्तू – निरंक

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by MAHAVEER MOTICHAND GADIYA
Date: 2026.05.08 13:50:39 +0530

कोल्हापूर. **(एम. एम. गादिया)**

दिनांकः ०८.०५.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.